‘प्रभाग क्र. २५ मधील फुगीर व मग्रुर उमेदवारांना मतदार घरचा रस्ता दाखवतील’
पान ४ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23




■ वर्ष –19, अंक–18 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 5 जानेवारी 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

# एका पक्षातून दुसऱ्या पक्षात गेलेले इच्छुक उमेदवार निवडून आल्यावर तरी ‘त्या’ पक्षाशी एकनिष्ठ राहतीलच कशावरून?

## काल विरोध, आज मिठी – हेच का नवे राजकारण?



**एका पक्षातून दुसऱ्या पक्षात गेलेले उमेदवार निवडणूक जिंकल्यानंतर तरी नव्या पक्षाशी प्रामाणिक आणि एकनिष्ठ राहतील, याची खात्री नेमकी कशावरून द्यायची? हा प्रश्न सध्या राजकीय वतुर्कात तीव्रतेने उपस्थित केला जात आहे. सत्तेची गणिते जुळवण्यासाठी होणाऱ्या पक्षांतरांमुळे मतदारांच्या विश्वासाला तडा जात असून लोकशाही मूल्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पक्षाचे तिकिट मिळाले नाही म्हणून इच्छुक उमेदवारांनी पक्ष कार्यालयांत राडे केले. शेवटी काहीं ना यात यश देखील आले. जे इच्छुक शिव्या शाप देत होते ते नंतर पाया पडू लागले. तुमची आमचे खरे मायबाप अशी शब्दसुमने उधळली काय खरे आहे या लोकांचं.... या विषयावर सर्वसामान्यांची भूमिका आम्ही मांडत आहोत...**

**कालपर्यंत** ज्या पक्षाच्या धोरणांवर टीका केली, त्याच पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवून सत्ता मिळवणे आणि पुन्हा संधी मिळेल तिथे भूमिका बदलणे, ही प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. अशा उमेदवारांची निष्ठा ही पक्षाशी नसून पद, सत्ता आणि स्वार्थाशी असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. मतदारांनी दिलेला कौल हा एखाद्या व्यक्तीपेक्षा पक्षाच्या विचारधारेला असतो. मात्र पक्षांतर करणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतरही पुन्हा भूमिका बदलतील का, याची भीती जनतेत आहे. यामुळे ‘आमचा मतदानाचा हक्क आणि निर्णय कितपत सुरक्षित आहे?’ असा सवाल सामान्य नागरिक विचारू लागला आहे. लोकशाहीत पारदर्शकता आणि निष्ठा महत्त्वाची असताना, पक्षांतराचे वाढते प्रकार ही चिंतेची बाब ठरत आहेत. यावर कठोर कायदे आणि नैतिक राजकारणाची गरज अधिक ठळकपणे पुढे येत आहे.

लोकशाही व्यवस्थेचा कणा म्हणजे मतदारांचा विश्वास. मात्र अलीकडच्या काळात वाढत चाललेली पक्षांतरांची राजकीय संस्कृती हा विश्वास कमकुवत करत आहे. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात गेलेले उमेदवार निवडून आल्यानंतर तरी नव्या पक्षाशी निष्ठावान राहतील, याची खात्री नेमकी कोण देणार? हा प्रश्न आता केवळ राजकीय चर्चेपुरता मर्यादित राहिलेला



निवडणूक विशेष

दिनेश परदेशी,
कार्यकारी संपादक
अट्टलमत

नाही, तर तो लोकशाहीच्या मुळावरच बोट ठेवणारा ठरला आहे. कालपर्यंत ज्या पक्षाच्या धोरणांवर सडकून टीका केली, त्याच पक्षाच्या व्यासपीठावर आज उमेदवार अभिमानाने उभा राहतो. निवडणूक जिंकली की विचारधारा बाजूला पडते आणि सत्तेचे आकर्षण पुढे येते. अशा वेळी हा लोकप्रतिनिधी जनतेचा आहे की केवळ संधीसाधू राजकारणाचा, असा प्रश्न निर्माण होतो. मतदार एखाद्या व्यक्तीला नव्हे, तर पक्षाच्या भूमिका, कार्यक्रम आणि विचारधारेला मतदान करतो. मात्र निवडणूक संपताच भूमिका बदलल्या गेल्या, तर मतदारांचा कौल अर्थहीन ठरतो. पक्षांतर करणारे लोकप्रतिनिधी पुन्हा कधी, कुठे आणि कोणत्या दिशेने वळतील, याचा नेम नसल्याने लोकशाहीत अस्थिरता वाढते. पक्षांतरविरोधी कायदा असतानाही त्यातील पळवाटा वापरून राजकीय स्वार्थ साधला जात आहे, ही बाब अधिक गंभीर आहे. कायदे असूनही जर नैतिकतेचा अभाव असेल, तर लोकशाही केवळ अंकगणित ठरते. सत्ता टिकवण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी विचारधारेची होळी होत असेल, तर ते लोकशाहीचे अपयश मानावे लागेल.

आज गरज आहे ती स्पष्ट भूमिकेची पक्ष बदलणे हा अधिकार असू शकतो, पण जनतेच्या कौलाशी प्रतारणा होणार नाही, याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा ‘निष्ठा पक्षाशी की सत्तेशी?’ हा प्रश्न अधिक तीव्र होत जाईल आणि त्याचे उत्तर लोकशाहीला महागात पडेल. अशा परिस्थितीत मतदारांनी विचारायचे की, आम्ही मत दिले ते प्रतिनिधीला की सौदेबाजीला? लोकशाही ही तात्पुरत्या सत्तासमाधानासाठी विचारधारेची देवाणघेवाण करण्याची बाजारपेठ नाही. तरीही आज ती तशीच बनवली जात आहे. पक्षांतर करणाऱ्यांच्या निष्ठेची हमी जर कोणालाच देता येत नसेल, तर अशा राजकारणाला लोकशाही म्हणायचे तरी कशावरून? निवडणूक जिंकल्यानंतरही जो विचारांवर ठाम राहू शकत नाही, तो उद्या जनतेशी प्रामाणिक राहील, याची अपेक्षा तरी कशी करावी? सत्ता मिळवण्यासाठी भूमिका बदलणारे हात शेवटी लोकशाहीचाच गळा आवळतात. त्यामुळे आता प्रश्न उमेदवारांचा नसून मतदारांच्या आत्मसन्मानाचा आहे. आणि तो जर आजच जागा झाला नाही, तर उद्या लोकशाही केवळ नावापुरती उरेल.

### असेही होवू शकते! हम साथ साथ है....

जे लोक अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे काम करीत असतील अन् त्यांनी इच्छुक उमेदवार म्हणून उमेदवारी मागितली परंतु त्यांना ती जर नाही मिळाली. परिणामी त्यांनी दुसऱ्या पक्षाशी (उदा. शिवसेना, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी, काँग्रेस किंवा इतर पक्ष) घरोबा केला. व तात्काळ निवडणुकीचे तिकिट ही मिळवून निवडून ही आले तरी मात्र तेथे त्यांना त्या पक्षाच्या ध्येय धोरणाशी ते एकमत, सहमत झाले नाही तर मग काय...... किंवा

भाजपला बेरजेचे गणित जमवतांना हेच त्यावेळेचे इच्छुक अचानक निष्ठावंत वाटतील व त्यांना गवसणी घालून आपल्या कळपात सामील ही करू शकतात. ही शक्यता सध्या राजकीय परिस्थितीतून तरी नाकारता येत नाही. त्यामुळे सध्या पक्षाची साथ सोडलेले नंतरही आपल्याचकडे येतील हेच धोरण अजमावले जात तर नसतील ना?..... म्हणजेच ‘सांप भी मरे और लाठी भी नहीं टूटे’ असा प्रकार दिसतो. जनतेने विश्वास ठेवावा तरी कसा? निष्ठा ठेवलेल्या पक्षाकडून तिकिट आणि मिळाले तरी दुसऱ्या पक्षाकडून तिकिट घेवून चुकून विजय झाला तर पुन्हा जुन्या पक्षाकडे जावून निष्ठा ठेवायला आज कालचे राजकारणी मागे पुढे पाहणार नाहीत. याची शक्यता नाकारता येत नाही.ज्या पक्षांनी अशा पिडितांना स्थान दिले त्यांचे मात्र तोंडघशी पडल्या सारखेच आहे.

# लातूरचे नवोदय विद्यालय हादरलं; वसतिगृहात विद्यार्थिनी आढळली मृतावस्थेत

**लातूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात शिकणाऱ्या सहावीतील विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संबंधित विद्यार्थिनीचा मृतदेह मुलींच्या वसतिगृहातील खोलीत पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. अत्यंत हुशार आणि अभ्यासू म्हणून ओळख असलेल्या या विद्यार्थिनीच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांसह शैक्षणिक वतुर्ळात शोककळा पसरली आहे.



मृत विद्यार्थिनी औसा तालुक्यातील टाका गावची रहिवासी असून तिचे कुटुंब मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. प्राथमिक माहितीनुसार, अभ्यासाचा ताण आणि शालेय दबावामुळेच विद्यार्थिनीने टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात असला तरी या प्रकरणाला संशयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच एम आयडीसी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आला आहे. हा प्रकार आत्म हत्या आहे की घातपात, याचा तपास करण्यासाठी पोलीस सर्व बाजूंनी चौकशी करत असून वसतिगृहातील कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे जबाब नोंदवले जात आहेत. दरम्यान, शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयात मृत विद्यार्थिनीचे आजी-आजोबा, आई-वडील यांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात होती.

या घटनेनंतर जवाहर नवोदय विद्यालयाच्या परिसरात मोठ्या संख्येने पालक जमा झाले. काही पालकांनी विद्यार्थ्यांवर शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याचे आरोप करत तक्रारी दाखल केल्या आहेत. अशा वातावरणामुळे विद्यार्थी मानसिक तणावात राहत असल्याचा दावा पालकांकडून करण्यात आला आहे. संभाव्य तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विद्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. या घटनेमुळे नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पोलीस तपासातून नेमके सत्य काय ते लवकरच समोर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शाहरुख खानच्या या निर्णयामुळे देशभरात वाद; राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या टोकाच्या प्रतिक्रिया

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खान सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एका निर्णयामुळे देशभरातून त्याच्यावर टीकेची झोड उठवली जात असून, काही संघटनांकडून तीव्र आंदोलन आणि आक्षेपार्ह वक्तव्येही केली जात आहेत. बांगलादेशात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शाहरुख खानविरोधात संतापाची लाट उसळल्याचं चित्र आहे.

बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या कथित अत्याचारांमुळे देशात आधीच तीव्र भावना आहेत. अशा परिस्थितीत शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघासाठी बांगलादेशी क्रिकेटपटूची निवड केल्याचा आरोप केला जात असून, त्याच निर्णयामुळे हा वाद अधिक चिघळला आहे. काही जणांनी शाहरुख खानवर देशविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप करत त्याला गद्दार ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

मेरठच्या दौराळा भागात आयोजित अटल स्मृती संमेलनात बोलताना भाजप नेते संगीत सोम यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप केले. आयपीएलमध्ये बांगलादेशी क्रिकेटपटूला कोट्यवधी रुपयांना खरेदी करणं हे देशविरोधी कृत्य असल्याचं त्यांनी म्हटलं. अशा लोकांना देशात राहण्याचा अधिकार नसल्याचा दावाही त्यांनी केला. बॉलिवूड आणि क्रिकेटच्या माध्यमातून देशविरोधी शक्तींना प्रोत्साहन दिलं जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

दरम्यान, अखिल भारतीय हिंदू महासभेनेही शाहरुख खानच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघात बांगलादेशी खेळाडूचा समावेश केल्यामुळे लोकांच्या भावना दुखावल्या गेल्याचं संघटनेचं म्हणणं आहे. या निषेधादरम्यान काही ठिकाणी अत्यंत आक्षेपार्ह आणि टोकाच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

आग्रा येथील हिंदू महासभेच्या जिल्हाध्यक्ष मीरा राठोड यांनी केलेलं वक्तव्य विशेष चर्चेत आलं आहे. त्यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप करत अत्यंत आक्षेपार्ह विधान केलं, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वतुर्ळातही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

याच प्रकरणात दिनेश फलाहारी महाराज यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून शाहरुख खानवर आरोप केले आहेत. शाहरुख खानला बांगलादेशातील परिस्थितीची माहिती असूनही त्याने बांगलादेशी खेळाडूला मोठ्या रकमेवर विकत घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच, शाहरुख खानचे बांगलादेशातील काही कट्टर घटकांशी संबंध असू शकतात, असा आरोपही या पत्रात करण्यात आला आहे. या आरोपांमुळे संपूर्ण प्रकरण अधिक गंभीर होत चाललं आहे. दरम्यान, या सर्व घडामोडींवर शाहरुख खान किंवा त्याच्या व्यवस्थापनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र या वादामुळे सोशल मीडियावर तीव्र चर्चा सुरू असून, समर्थन आणि विरोध अशा दोन्ही बाजूंनी प्रतिक्रिया येत आहेत.

## मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा

**दर्पण** या वृत्तपत्राद्वारे मराठी भाषेतील पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे, इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्च विद्याविभूषित, पंडिती व्यक्तिमत्त्व म्हणजे बाळशास्त्री जांभेकर होत. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात बाळशास्त्री जांभेकरांचा मोठा वाटा होता. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून आपल्या कार्याचा ठसा १८३२ ते १८४६ या काळात उमटवला.

ब्रिटिशांनी भारतात येताच कोलकत्त्यामध्ये ‘बेंगाल गॅझेट’ नावाने इंग्रजी साप्ताहिक २९ जानेवारी १७८० रोजी सुरु केले. ब्रिटिश सरकारने आपल्या स्वार्थासाठी ठिकठिकाणी मुद्रणालये सुरु केली. समाज प्रबोधन करण्यासाठी हे महत्त्वाचे साधन आहे. त्याकरिता समाजाचे विचार परिवर्तन न होणारे वृत्तपत्र निघू नये, अशी त्यांची धारणा होती. परंतु कालांतराने आपले विचार प्रकट करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम असल्याची भारतीयांना जाणीव झाली. यानंतर अनेक भारतीय भाषांतील वृत्तपत्र निघू लागली. बंगालीनंतर मराठी असा भाषिक वृत्तपत्रांचा क्रम लागतो.

ब्रिटिशांनी भारतात आपले बस्तान सार्वजनिक केल्यानंतर पाश्चिमात्य संस्कृती मूल्यांचा भारतातील पारंपरिक जुन्या मूल्यांशी संघर्ष निर्माण झाला. तथापि, पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे भारतीय पंडितांना समाजातल्या घडामोडींची भौतिक दृष्टीने कारणमीमांसा करण्यास प्रोत्साहनही मिळाले. समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. यातूनच एकसंध समाज निर्माण करण्यासाठी समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत, याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली.

ब्रिटीश सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या कलकत्ता, मद्रास (चेन्नई), मुंबई येथे इंग्रजी वृत्तपत्रांची सुरुवात झाली. परंतु जनतेच्या अस्तित्वाला या वृत्तपत्रात विशेष स्थान देण्यात येत नसे. या वृत्तपत्रांवर सरकारचे विशेष लक्ष होते. जहाजांची ये-जा, जाणाऱ्या-येणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे, सरकारी जाहिराती आदी मजकूर वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात येत असे. यामुळे भारतीय सुशिक्षित वर्गात वृत्तपत्र ही कल्पना रुजू लागली. इंग्रजी भाषेत वृत्तपत्रे निघतात तर भारतीय भाषांतही अशी वृत्तपत्रे का निघू नयेत, असा प्रश्न निर्माण झाला. कोलकत्ता येथे पहिले इंग्रजी वृत्तपत्र निघाल्यामुळे या शहरात पहिल्या भाषिक वृत्तपत्राचाही प्रारंभ झाला. भारतीय समाजाने नवीन वैचारिक जागृती आणि नवी जाणीव निर्माण होण्यास या वृत्तपत्रामुळे मदत झाली. जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी ‘बेंगॉल गॅझेट’च्या आगमनानंतर तब्बल अर्ध्या दशकाने म्हणजेच ५२ वर्षांनी ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर या विद्वानानं ‘दर्पण’ च्या रुपाने पहिले मराठी वृत्तपत्र सुरु केले. मुंबईत जांभेकरांनी ‘दर्पण’च्या माध्यमातून सुरु केलेली वैचारिक प्रबोधनाची पेरणी मराठी भूमीत रुजण्यास सुरुवात झाली.

एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या जांभेकरांना आपण दर्पणकार म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली. भविष्यकाळातील माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकीय सत्तेला उलथून टाकायचे असेल तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही, हे त्यांना फार पूर्वीच समजले होते. बाळशास्त्री हे कडवे देशाभिमानी होते. त्यांच्या या देशसेवा आणि समाजसेवेच्या जाणिवेतूनच दर्पणसारख्या नियतकालिकाचा जन्म झाला. मराठी वृत्तपत्रविश्वात नवी पहाट उगवली. दर्पणचा जन्म होताना गोविंद कुंटे व भाऊ महाजन यांचेही सहकार्य बाळशास्त्रींना लाभले. त्यावेळी बाळशास्त्रींचे वय अवघे वीस वर्षांचे होते. एका वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषेत प्रकाशित होणारे हे वृत्तपत्र! या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक स्तंभ इंग्रजीत असे. मराठी मजकूर अर्थातच सर्वसामान्य जनतेसाठी होता आणि इंग्रजी मजकूर हा वृत्तपत्रात काय लिहिले आहे, हे राज्यकर्त्यांनाही कळावे यासाठी होता. वृत्तपत्राची संकल्पना त्याकाळी लोकांना नवीन होती. त्यामुळे दर्पणचे वर्गणीदार सुरुवातीच्या काळात खूप कमी होते. पण हळूहळू लोकांमध्ये ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. दर्पणवर प्रथमपासूनच बाळशास्त्री जांभेकरांच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. दर्पण अशा रितीने साडेआठ वर्षे चालले आणि जुलै १८४० ला त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला.

# बाळशास्त्री जांभेकरांनी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली

**मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी ज्यांनी मोलाचे कार्य केले. त्या दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे स्मरणपर्व या हेतुने ६ जानेवारी हा दिवस पत्रकार तथा पत्रकारिता दिन म्हणून महाराष्ट्रभर साजरा केला जातो. नवीन जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवून त्यांनी या परंपरेचा पाया घातला. त्या निमित्ताने हा विशेष लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या त्रोटक शब्दांत... संपादक.**



कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी दि.६ जानेवारी १८१२ रोजी बाळशास्त्रींचा जन्म एका पुराणिकाच्या घरी झाला. अज्ञान, दारिद्र्य आणि रुढीप्रिय समाजाच्या अंध:कारातून बाहेर पडण्यासाठी ते मुंबईत आले. तेथे बापू छत्रे यांच्या निवासस्थानी राहून त्यांनी अध्ययन सुरू केले. आपल्या विलक्षण बुद्धिचातुर्याने व तल्लख स्मरण शक्तीने त्यांनी त्या वेळच्या सार्वजनिक जीवनावर विलक्षण छाप टाकली. सन १८३०मध्ये हिंद शाळा पुस्तक मंडळाचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि एक नवे क्षितिज त्यांच्यासाठी खुले झाले. त्यांनी आता ग्रंथरचनेस प्रारंभ केला. त्यानंतर वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी जन्मदिनी दि.६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या पत्राची मुहूर्तमेढ रोवली. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात केले. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी! ती महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी केली. प्रयत्नशील व वैचारिक चळवळ सुरू केली. त्यांनी समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी हेच आपले जीवनकार्य मानले.

मराठी पत्रकारितेचा पाया श्रेष्ठ दर्जाच्या संपादकाने- आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला. त्यांनी अल्पावधित महाराष्ट्राच्या जीवनावर विलक्षण छाप टाकली. त्यांनी राष्ट्रीय विकासासाठी पोषक अशा बहुविध क्षितिजाचा विकास केला. त्यामुळे त्यांना पश्चिम भारतामधील प्रबोधनाचे प्रवर्तक म्हटले जाते. मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी त्यांनी बजावलेले कार्य हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविण्यासारखे आहे. त्यामुळे परंपरेचा सुवर्णप्रवाह विकसित झाला. प्रथम श्रेणीचे आद्य वृत्तपत्र म्हणून ‘दर्पण’ वृत्तपत्राची कामगिरी लक्षणीय अशी ठरली आहे.

दर्पण हे वृत्तपत्र सन १८३२मध्ये काढून मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा त्यांनी पाया घातला. त्यांनीच सन १८४०मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. त्यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू, या उपक्रमांमागे होता.

सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करुन नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाव्दारे रुजविली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. मराठी पत्रकारितेच्या विचार विश्वात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांसारखी विलक्षण कामगिरी बजावणारे ते त्यामुळे युगप्रवर्तक पत्रकार ठरले. सन १८३४मध्ये भारतातील पहिले प्राध्यापक-प्रोफ़ेसर होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. एलफिंस्टन निधीतून त्यांच्यासाठी स्वतंत्र अध्यासन निर्माण करण्यात आले. सन १८४५मध्ये राज्यातील शिक्षण विभागाचे संचालक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. प्राध्यापक या नात्याने अध्ययन, अध्यापन संशोधन व विस्तार ही कार्ये पार पाडण्यात त्यांनी धन्यता मानली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी वैचारिक चळवळ सुरु केली. समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी तेच त्यांनी आपले जीवनकार्य मानले. प्राध्यापक या नात्याने केवळ अध्यापन व संशोधनात ते व्यग्र होते, असे नाही तर त्यांनी राष्ट्रीय जीवनात अनेक प्रागतिक चळवळींना गती दिली. सामाजिक प्रबोधनात वृत्तपत्रासारखे दुसरे साधन नाही, हे ओळखून त्यांनी बंगाली वृत्तपत्रांपासून प्रेरणा घेतली. राजाराम मोहन रॉय यांचे कार्य आणि बंगाली पत्रांनी केलेला झंझावाती प्रचार यामुळे ते प्रभावित झाले. त्यांनी नव्या पत्राचा संकल्प करून तो कृतीत आणला. ध्येयवादी बंगाली पत्राचा वस्तुपाठ त्यांनी गिरविला आणि त्यातून महाराष्ट्रात नवीन लोकचळवळ उभारली. गंगा-यमुना द्वैभाषिक पत्र ही परंपरा बंगालतून महाराष्ट्रात पुढे आली. आचार्य बाळशास्त्रीं जांभेकर यांच्या समग्र जीवनाकडे पाहिले असता त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विलोभनीय दर्शन घडते. त्यांना देशी व विदेशी ९ भाषा अवगत होत्या. मराठी, इंग्रजी, संस्कृत, बंगाली, कन्नड इत्यादीप्रमाणे त्यांनी विदेशी भाषांचाही अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासविषयात भाषाशास्त्रे, इतिहास व संस्कृती, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्वविद्या इत्यादीचा समावेश होता. या सर्व विषयात त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचनाही केली. त्यांच्या कार्याबद्दल तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये प्रामुख्याने बॉम्बे टाईम्स, कुरियर, ज्ञानोदय, ओरिएंटल स्पेक्टेटर इत्यादी पत्रांनी वारंवार प्रशंसा केलेली आढळते व त्यांच्या समाजकार्याची नोंदही घेतलेली दिसते. तत्कालीन शाळा खात्याने त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. मुंबई न्यायालयाचे त्यावेळचे न्या.सर टी.ई.पैरी यांनी त्यांचा गौरव केला होता. रे.डॉ. विल्सन व न्या.चंदावरकर या तत्कालीन विद्वानांनी त्यांच्या लोकाभिमुख विद्वत्तेचा गौरव केला होता. आज बऱ्याच ठिकाणी पत्रकार बांधवाच्या वतीने उत्कृष्ट साहित्यिक, लेखक, कवी, समाजसेवक आदींना दर्पणकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येऊ लागले आहे. समाजानेही पत्रकार बांधव वृत्तसंकलनरुपात करीत असलेली अविरत- अहर्निश सेवा व न्यायदानाची धडपड लक्षात घेऊन यथोचित त्यांचाही दर्पणकार पुरस्काराने गौरव केला पाहिजे, असे जाहीरपणे सुचवावेसे वाटते. भारतीय राष्ट्रवादाचे पितामह दादाभाई नौरोजी हे जांभेकरांचे विद्यार्थी होते. त्यांनी गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे, की ते पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वान मुकुटमणी, प्रख्यात पं.अद्वितीय विद्वान होते. मुंबईना समाचार या गुजराथी पत्राने या शिक्षण महर्षींची स्मृती भारतीयांनी सतत जागृत ठेवावी, असे आवाहनही केले होते. दि.१७ मे १८४६ रोजी जांभेकरांचा आकस्मिक मृत्यू झाला. पण अल्पावधित त्यांनी बजावलेले कार्य महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा कायापालट करणारे ठरले, हेच खरे! !! अशा या थोर आद्य पत्रकारास लाख लाख विनम्र अभिवादन !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

**पत्रकारिता** ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो. दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे ‘द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म‘ या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने. कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे. त्यामुळे पत्रकारितेला ‘चौथास्तंभ‘ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात ‘चौथास्तंभ‘.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात ‘पत्रकारितेची शैली‘. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून

**पान ३ वर...**

# महाशक्ती होण्यासाठी सिविक सेन्स आवश्यक!

**सार्वजनिक** जीवनातील शिस्त, म्हणजेच सिविक सेन्स, ही कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीची पहिली आणि अत्यावश्यक अट आहे. एखादे राष्ट्र महाशक्ती होण्यासाठी केवळ आर्थिक प्रगती, तांत्रिक विकास किंवा लष्करी सामर्थ्य पुरेसे ठरत नाही. त्या राष्ट्रातील नागरिकांचे वर्तन, सामाजिक जबाबदारी, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सामूहिक कर्तव्यभावना या गोष्टी राष्ट्राच्या खऱ्या सामर्थ्याचे मोजमाप ठरतात. राष्ट्राची घडण समाजाच्या मूल्यांवर उभी असते. राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, कर्तव्यनिष्ठा, कायद्याचा आदर, नैतिकता, प्रामाणिकपणा, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समानता, जाती-धर्माच्या पलीकडे राष्ट्रभावना आणि परस्पर विश्वास या सर्व बाबी समाजात रुजल्या, तर राष्ट्राची अंतर्गत शक्ती प्रचंड वाढते. हीच अंतर्गत शक्ती राष्ट्राला दीर्घकाळ टिकणारी महाशक्ती बनवते.

महाशक्ती घडविण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन संस्कृती, वैज्ञानिक दृष्टिकोन, कौशल्य विकास, तांत्रिक साक्षरता, व्यावसायिक प्रशिक्षण, उद्योजकतेला चालना, जागतिक दर्जाची विद्यापीठे, नेतृत्व विकास आणि मूल्याधारित शिक्षण यांमधून सक्षम मानवी भांडवल घडते. सक्षम नागरिकांशिवाय कोणतेही राष्ट्र प्रगत होऊ शकत नाही. आर्थिक शक्ती ही महाशक्तीची कणा असते. मजबूत अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण, रोजगारनिर्मिती, शेती व ग्रामीण विकास, निर्यातवृद्धी, स्टार्टअप संस्कृती, आर्थिक शिस्त, पारदर्शक करप्रणाली, ऊर्जा सुरक्षितता आणि सक्षम पायाभूत सुविधा रस्ते, बंदरे, विमानतळ, दळणवळण या सर्व बाबी राष्ट्राच्या सामर्थ्याचा पाया घडवतात.



**-डॉ. भारत कराड**
**प्राचार्य, सामाजिक व राजकीय विश्लेषक**

राष्ट्र सुरक्षित नसेल तर विकास टिकत नाही. मजबूत लष्कर, संरक्षण उत्पादनात स्वावलंबन, सायबर सुरक्षा, सीमासुरक्षा, अंतर्गत सुरक्षा, गुप्तचर यंत्रणा, दहशतवादविरोधी धोरण, आपत्ती व्यवस्थापन, अवकाश सुरक्षा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारित संरक्षण व्यवस्था या घटकांमुळे राष्ट्राची सुरक्षितता भक्कम राहते.

महाशक्तीला सुशासनाची साथ लागते. पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था, जलद न्यायव्यवस्था, धोरणात्मक स्थिरता, सक्षम लोकसेवा, डिजिटल गव्हर्नन्स, विकेंद्रित प्रशासन, जबाबदार राजकारण आणि लोकशाही मूल्यांची जपणूक यांमुळे नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास दृढ होतो. पर्यावरण संतुलनाविना विकास अपूर्ण ठरतो. पर्यावरण संरक्षण, हवामान बदल धोरण, जलसंधारण, स्वच्छ ऊर्जा, प्रदूषण नियंत्रण, हरित तंत्रज्ञान, जैवविविधता संवर्धन, शाश्वत विकास आणि संसाधन व्यवस्थापन या बाबी भविष्यासाठीची गुंतवणूक आहेत. महाशक्ती जागतिक पातळीवरही प्रभावी असते. मजबूत परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता, जागतिक व्यापारातील सहभाग, सांस्कृतिक कूटनीती, शांततामिशनमधील योगदान, जागतिक नेतृत्व क्षमता, तांत्रिक भागीदारी, आंतरराष्ट्रीय करार, सॉफ्ट पॉवर आणि मानवतावादी नेतृत्व यांमुळे राष्ट्राची प्रतिमा उंचावते. समाज सर्वसमावेशक नसेल तर विकास अपूर्ण राहतो. दारिर्द्यनिर्मूलन, आरोग्यसेवा, पोषण सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, ग्रामीण-शहरी समतोल, युवक सशक्तीकरण, महिलांचे सक्षमीकरण, दिव्यांग समावेश, वंचित घटकांचा विकास आणि जीवनमान उंचावणे यांमुळे सामाजिक स्थैर्य निर्माण होते. राष्ट्राची ओळख त्याच्या संस्कृतीतून दिसते. सांस्कृतिक वारसा, भाषा, कला, क्रीडा, साहित्य, परंपरा-आधुनिकता संतुलन, ऐतिहासिक स्मृती, राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान आणि सांस्कृतिक आत्मविश्वास हे राष्ट्राचे आत्मभान घडवतात. या सर्व घटकांना एकत्र बांधणारा मुख्य सूत्रधागा म्हणजे सार्वजनिक जीवनातील शिस्त, म्हणजेच सिविक सेन्स होय. शिस्त, संयम, कष्टाची तयारी, त्यागभावना, संघभावना, नेतृत्ववृत्ती, जबाबदारीची जाणीव, नैतिक धैर्य आणि 'राष्ट्रहित प्रथम' ही भावना समाजात रुजली, तर राष्ट्राला कोणीही रोखू शकत नाही.

युवक, माध्यमे आणि नागरिक सहभाग

राष्ट्राच्या भवितव्याची जबाबदारी युवकांवर आहे. युवकांमध्ये नागरिक जाणीव रुजली, तर समाजात परिवर्तन वेगाने घडते. युवकांनी स्वच्छता मोहिमा, वृक्षलागवड, रक्तदान, पर्यावरण संवर्धन, वाहतूक शिस्त जनजागृती अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा. समाजमाध्यमांचा वापर जनजागृतीसाठी केल्यास समाजावर सकारात्मक परिणाम होतो. माध्यमांनी सकारात्मक उदाहरणे पुढे आणली, तर समाजात शिस्तीचे संस्कार बळकट होतात. स्थानिक स्वराज्य संस्थांनी नागरिक सहभाग वाढवून विकास प्रक्रियेत लोकांचा विश्वास दृढ करावा.

नागरिक जाणीव वाढवण्यासाठी कायदे, अंमलबजावणी, शिक्षण, माध्यमे आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. परंतु या सर्व प्रक्रियांना यश तेव्हाच मिळते, जेव्हा प्रत्येक नागरिक स्वतःची जबाबदारी ओळखतो. राष्ट्र इमारतींनी नव्हे, तर विचारांनी घडते. नागरिक सजग, शिस्तबद्ध आणि जबाबदार झाले, तर समाज सशक्त होतो. समाज सशक्त झाला, तर राष्ट्र बळकट होते. महाशक्ती होण्यासाठी सार्वजनिक जीवनातील शिस्त म्हणजेच सिविक सेन्स ही राष्ट्रउभारणीची खरी गुरुकिल्ली आहे.

पान २ वरून...

## पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

तिक्ष्ण (धारधार) लीखाण केल्या जाते. यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात. पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते. कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल, जल, वायु, आकाश - पाताळ, ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात. आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निमर्ळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विर्श्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते. मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध, गीतपाठ, वेदपठण, अमरकोश, लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' हे मराठीतील 'पहिले वृत्तपत्र होय. त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी 'दर्पण' मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा 'संवाद कौमुदी' टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे 'मुकनायक' ही सर्व वृत्तपत्रे 'आर्थीक तोटा' सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार )**

## पैशांचा खेळ आणि सत्तेचा वापर करून उमेदवार बिनविरोध : ही मतदारांची फसवणूकच!

लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती जनतेच्या इच्छेचा, विचारांचा आणि पर्याय निवडण्याच्या अधिकाराचा उत्सव आहे. मात्र अलिकडच्या काळात पैशांचा खेळ, सत्तेचा दुरुपयोग आणि दबावतंत्र यांच्या जोरावर उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचे जे प्रकार वाढत आहेत, ते या लोकशाहीच्या मुळावरच घाव घालणारे आहेत. बिनविरोध निवड म्हणजे लोकशाही यश नव्हे, तर अनेकदा ती मतदारांच्या हक्कांवर टाकलेली गदा ठरते. कागदोपत्री बिनविरोध निवड ही कायदेशीर प्रक्रिया असली, तरी तिच्यामागील वास्तव अनेकदा अस्वस्थ करणारे असते. विरोधी उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरूच न देणे, दबाव टाकणे, आर्थिक प्रलोभने दाखवणे, सत्तेची भीती निर्माण करणे, या सर्व मार्गांनी स्पर्धाच संपवली जाते. अशा वेळी मतदाराला मतदानाचा हक्क मिळतोच कुठे? निवडणूक न होता सत्ता हस्तगत केली जाते, ही वस्तुस्थिती लोकशाहीच्या आत्म्यालाच छेद देणारी आहे.

लोकशाहीत निवडणूक ही स्पर्धेची प्रक्रिया आहे. विचारांची, कार्यक्रमांची, धोरणांची आणि नेतृत्वगुणांची तुलना करण्याचा तो एकमेव मार्ग आहे. मात्र बिनविरोध निवडींच्या नावाखाली ही तुलना टाळली जाते. पैसा आणि सत्ता यांच्यापुढे सामान्य नागरिकाचा आवाज गुदमरतो. मतदाराला विचारण्याआधीच निर्णय घेतला जातो. ही प्रक्रिया म्हणजे लोकशाहीचे औपचारिकीकरण आणि लोकशक्तीचे हत्यारांतर होय. आज स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा इतर निवडणुका बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढत चालले आहे. यामागे 'एकमत', 'संमती', 'शांतता' असे गोंडस शब्द वापरले जात असले, तरी प्रत्यक्षात ही शांतता दडपशाहीतून निर्माण झालेली असते. विरोधी मत मांडण्याचे धाडसही अनेकांना करता येत नाही, ही खरी शोकांतिका आहे. पैसा बोलतो, सत्ता धमकावते आणि लोकशाही गप्प बसते. हे चित्र केवळ राजकीय पक्षांचे अपयश नाही, तर समाजाच्या सामूहिक संवेदनशून्यतेचेही द्योतक आहे. लोकशाही ही मागून मिळणारी देणगी नसून, पुढे जाऊन मिळवायची जबाबदारी आहे. मतदार जर ङ्गबिनविरोध म्हणजे चांगलेङ्घ असे मानू लागला, तर तो स्वतःच आपल्या अधिकारांवर पाणी सोडतो आहे, हे लक्षात घ्यायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीला केवळ राज्यपद्धती नव्हे, तर जीवनपद्धती मानले. या जीवनपद्धतीत मतभेद, विरोध आणि पर्याय यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जिथे विरोध संपवला जातो, तिथे लोकशाही संपते आणि एकाधिकारशाहीची बीजे रोवली जातात. बिनविरोध निवडींचा अतिरेक हीच बीजे रुजवतो आहे. निवडणूक आयोग, प्रशासन आणि राजकीय पक्ष यांनीही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. बिनविरोध निवडी हा अभिमानाचा विषय न मानता, अपवाद म्हणून पाहिले गेले पाहिजे. मुक्त, निर्भय आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे ही केवळ घटनात्मक जबाबदारी नाही, तर लोकशाही टिकवण्याची अट आहे. मतदारांनीही जागे होणे गरजेचे आहे. निवड करण्याचा अधिकार हा लोकशाहीचा गाभा आहे. तो हिरावून घेतला जात असेल, तर ती शांततेने स्वीकारण्याची बाब नाही. पैसा आणि सत्तेच्या जोरावर उभे राहणारे बिनविरोध उमेदवार लोकप्रतिनिधी नसून, लोकशाहीच्या पोकळपणाचे प्रतीक ठरतात. लोकशाही ही संघर्षातून घडलेली व्यवस्था आहे. ती टिकवायची असेल, तर संघर्षाची तयारीही ठेवावी लागते, विचारांचा संघर्ष, मतांचा संघर्ष आणि अन्यायाविरुद्धचा संघर्ष. बिनविरोध निवडींच्या नावाखाली जर हा संघर्ष संपवला जात असेल, तर तो लोकशाहीचा विजय नव्हे, तर पराभव आहे.

आज प्रश्न साधा आहे, आपल्याला मतदार हवेत की फक्त आकडे? निवडणूक हवी की केवळ घोषणा? जर उत्तर लोकशाहीच्या बाजूने असेल, तर पैशांचा खेळ आणि सत्तेच्या जोरावर घडवली जाणारी बिनविरोध निवड ही मतदारांची फसवणूक आहे, हे ठामपणे सांगावेच लागेल. लोकशाही टिकवायची असेल, तर निवडणूक ही स्पर्धा म्हणूनच झाली पाहिजे.

अन्यथा उद्या मतदान केंद्रे उघडी राहतील, पण लोकशाही आतून केव्हाच बंद झालेली असेल. मुंबईत उमेदवारी मागे न घेतल्यास धमकी देऊन विरोधी उमेदवारांना मैदानातून हुसकावून लावले आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या उमेदवाराचा बिनविरोध विजय साजरा करत बॅनर, पोस्टर झडकवले, ही घटना लोकशाहीच्या इतिहासात काळ्या अक्षरांनी नोंदवावी अशी आहे. हा विजय नसून धाक, धमकी आणि दहशतीवर उभारलेली सत्ता आहे. निवडणूक न होता विजयाचे जल्लोष करणे म्हणजे मतदारांच्या तोंडावर तमाचा मारण्यासारखे आहे. मत मांडण्याचा, निवडणूक लढवण्याचा आणि पर्याय देण्याचा हक्क जर धमकीच्या जोरावर हिरावून घेतला जात असेल, तर ती लोकशाही नाही; तो उघडपणे सत्तेचा गैरवापर आहे.

मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत असा प्रकार घडतो आणि सत्ताधारी त्याचे प्रदर्शन मिरवत असतील, तर हा केवळ राजकीय अधःपतनाचा नव्हे, तर लोकशाहीच्या निर्लज्जपणाचा कळस आहे. बिनविरोध निवड ही अभिमानाची बाब नाही, विशेषतः ती धमकीतून जन्माला आली असेल तर ती लाजिरवाणी आहे. विजयाचे पोस्टर झडकवताना एकही प्रश्न सत्ताधाऱ्यांनी स्वतःला विचारला का? ही सत्ता मतांनी मिळाली आहे की भयाने? ही निवड जनतेची आहे की गुंडगिरीची? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानात धमकीला जागा नाही; विरोधाला आहे. मतभेदांना आहे, पर्यायांना आहे. पण आज मुंबईत जे घडले, ते संविधानाच्या आत्म्यावर चालवलेले बूट आहे. अशा 'विजयां'मुळे लोकशाही मजबूत होत नाही; ती आतून पोखरली जाते. निवडणूक आयोग, प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे मौन हे या दहशतीला दिलेले मूक समर्थन ठरते.

आज जर धमकी देऊन उमेदवारी मागे घ्यायला लावली जात असेल, तर उद्या मतदारांनाच मतदानापासून रोखले जाणार नाही, याची काय खात्री? लोकशाही ही भीतीत जगण्यासाठी नाही, तर निर्भयपणे निवड करण्यासाठी आहे. मुंबईत घडलेला हा प्रकार म्हणजे सत्तेचा विजय नव्हे, तर लोकशाहीचा पराभव आहे. आणि अशा पराभवावर झळकवले जाणारे बॅनर हे विजयाचे नव्हे, तर लोकशाहीच्या मृत्यूचे फलक आहेत.

**– प्रवीण बागडे, नागपूर**

# क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**


दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी ज्ञान संदिप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ. आंबेडकर नगर सिडको एन ७ छत्रपती संभाजी नगर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान केली होती.सर्व प्रथम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सचिव श्रीमती. संगीता खिल्लारे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी पायल मिसाळ व कुमारी पूनम मगरे यांनी केले यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याजीवनावर भाषणे केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्रीमती. संगीताताई खिल्लारे व संदीप सोनवणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर श्रीमती वैशाली बागुल यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची माहिती ओवी गावून केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. सुनील चौधरी संजय चौधरी हर्षल पगारे विजय पाटील रत्नमाला घोरपडे नजमा खान सुनिता शेजुळ यांनी परिश्रम केले संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले यांच्या थोर सामाजिक शैक्षणिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. शेवटी श्री हर्षल पगारे यांनी आभार प्रदर्शन केले. संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला

# परम पूज्य नियमसागर महाराज अवतरण दिवस उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पार्श्वनाथ ब्रह्मचर्य जैन गुरुकुल वेरूळ मध्ये परम पूज्य आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियम सागर महाराज यांचा वार्षिक चातुर्मास विगत ६ म हिन्यापासून संपन्न झाला याच निमित्ताने आज गुरुवार रोजी पूज्य नियमसागर महाराज यांचा अवतरण (जन्मदिन) दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमात अध्यक्ष स्थानी प्रशांत जैन मुंबई हे होते. तर प्रमुख अतिथी पदी मुंबई येथील ,डॉ सुहास शहा, मोनिका शहा, संदीप भुरे योगिता भुरे संभाजी नगर येथील उद्योजक विजय पाटणी, सुनंदा पाटणी, गंगापूर विधान सभेचे आमदार प्रशांत बंब कारंजा येथील महावीर ब्रह्मचारी आश्रम जैन गुरुकुल चे सतीश संगइ ,परिमल रुईवले सुहास चवरे प्रमोद चवरे, राजाभाऊ डोणगावकर उद्धर चवरे, पार्श्वनाथ जैन गुरुकुल अध्यक्ष दिनेश गंगवाल मार्गदर्शक वर्धमान पांडे, महामंत्री डॉ प्रेमचंद पाटणी नवीन पाटणी,गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर शालेय समितीचे अध्यक्ष मदनलाल पांडे निर्मल कुमार ठोले, गौतम ठोले, सुमित ठोले, गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकुमार नवले रानु जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेतर्फे सर्व मान्यवरांचे पुष्प गुच्छ व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी परम पूज्य नियमसागर महाराज यांच्या पदप्रक्षालन करण्याचा सन्मान प्रशांत बंब व सुहास शहा यांना प्राप्त झाला याचवेळी पूज्य नियमसागर महाराज यांना शास्त्र भेट देण्यात आला. यावेळी परम पूज्य नियमसागर महाराज यांचे पूजन सर्व मान्यवर व उपस्थित सर्व श्रावक श्राविका यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी दिनेश गंगवाल यांनी कार्यक्रमाचा उद्देश आपल्या मनोगतातून व्यक्त केला. प्रशांत बंब यांनी आपल्या मनोगतातून सर्व ठिकाणी होणारा अनावश्क खर्च कसा टाळता येईल याचा विचार करावा तसेच गुरुकुल लगत च पक्का रस्ता करून देण्याचा विचार व्यक्त केला तर प्रशांत जैन यांनी धार्मिक उन्नती साठी दिले गेलेले दान कधीही व्यर्थ जात नाही तसेच डॉ सुहास शहा यांनी नोकरी न करता व्यवसाय केला तर धर्मासाठी आपण आपला वेळ देऊ शकतो व आई टी आय च्या माध्यमातून नोकरी ऐवजी व्यवसायचे प्रशिक्षण दिले जाते ही बाब गौरवास्पद आहे

यावेळी प्रमुख अतिथी सुनंदा पाटणी यांनी गुरुकुल साठी पाच लाख रु ची बृहतब दान घोषीत केली. कारंजा गुरुकुलचे विश्वस्त सतीश संगई यांनी आपल्या मनोगतातून संमतभद्र महाराज यांनी अनेक गुरुकुल ची स्थापना करून विद्यार्थी घडविण्याचे अलौकिक कार्य केले. प्राचार्य विजय रननवरे यांनी आई टी आय ने १६ वर्षात केलेला प्रगती चा आढावा सर्वांसमोर व्यक्त केला. यावेळी परम पूज्य नियमसागर म हाराज यांनी फास्ट फूड चे आरोग्यावर होणारे दुष्परिमाण किती धोकादायक आहे त्यामुळे सर्वांनी याचा आजीवन त्याग करावा, असे आपल्या प्रवचनातून उद्बोधन केले. मनीष भैया यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले अशी माहिती अतुल बादे नरेंद्र अजमेरा पियश कासलीवाल यांनी दिली.

# ‘प्रभाग क्र. २५ मधील फुगीर व मग्रुर उमेदवारांना मतदार घरचा रस्ता दाखवतील’

**दिनेश परदेशी (8275503573) - अट्टल मत विशेष प्रतिनिधी**

**प्रभाग २५ मध्ये काट्याची टक्कर होण्याची चिन्हे दिसत आहेत. कोण वरचढ होईल हे सांगता येत नाही. पण नागरिकांच्या सोयी सुविधा देणारे उमेदवारच या स्पर्धेत खरे उतरतील. फुगीर व मग्रुरी असलेल्या उमेदवाराला मतदार घरचा रस्ता दाखवतील. असे म्हटले जात आहे. सत्ताधारी पक्षाचे नेतेमंडळी म्हणते या प्रभागात जास्त काम करण्याची गरज नाही. परंतु नागरिकांना जेव्हा आमच्या प्रतिनिधींनी विचारणा केली तेव्हा सर्व पितळ उघड झाले. टवाळखोर मुलांची फौजच कॉलन्या कॉलन्यांत फिरते. रात्री ही यांची दहशत असते. नशेखोरी, महिला सुरक्षा, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यासह इतर ही महत्त्वपूर्ण समस्यांकडे लक्ष दिले पाहिजे, असे नागरिकांनी सांगितले. नवीन काय योजना या प्रभागांतील वॉर्डात आणता येतील. यावर मात्र प्रकाश टाकण्यात अनेक उमेदवार कचरत होते.**



रविवार दि. ४ जानेवारी रोजी मूर्तिजापूर, जयहिंदनगर व इतर परिसरात शिवसेनेकडून प्रचार रॅली काढण्यात आली याप्रसंगी उमेदवार बळीराम कदम यांच्यासह इतर उमेदवारांचे औक्षण दुर्गा परदेशी यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत प्रभाग २५ मधून अ गटातून शिवसेना या पक्षाकडून प्रशांत वाघ ब मधून नवपुते चंद्रकला क मधून सुनीता पवार आणि ड गटातून बळीराम कदम हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. प्रभागात अनेक ठिकाणी रॅलीच्या माध्यमातून मतदारांची भेट घेवून त्यांना आम्ही कसे आपल्या प्रभागासाठी काम करू असे सांगत आहेत. मुर्तूजापुर कॉलनी, म्हाडा कॉलनी व इतर ठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच औक्षणही करण्यात आले. भाजपकडूनही दिग्गज नेत्यांच्या नातेवाईकही निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. अनेक वर्षे भाजपात कार्य करणारे बळीराम कदम यांच्यावर अन्याय झाल्याचे नागरिकांनी सांगितले. शेवटपर्यंत सर्वांना वाटत होते की, कदम यांना किंवा त्यांच्या पत्नींना तरी यावेळी महानगरपालिका निवडणुकीचे तिकीट मिळेल परंतु तसे झाले नाही. परिणामी त्यांना दुसऱ्या पक्षाची वाट धरावी लागली व निवडणुकीच्या रिंगणात दोन हात करण्यासाठी उतरावे लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ही वाटते की जो कार्यकर्ता खरीच महेनत घेवून लोकसभा, विधानसभा व इतर निवडणुकांसाठी पक्षाचे निष्ठेने काम करतो त्याला न्याय मिळाला पाहिजे. परंतु स्थानिक पातळीवरील नेते मंडळी मात्र याचा गैरफायदा घेत आपल्याच परिवारातील नातेवाईकाला कसे एटजेस्ट करून फायदा मिळवता येईल याच राजकारणात असतात. याचा रोष मात्र जनतेत असतो. असे अट्टलमतच्या विशेष प्रतिनिधींना महिला व नागरिकांनी सांगितले. या प्रभागात काट्याची टक्कर होण्याची चिन्हे दिसत आहेत. कोण वरचढ होईल हे सांगता येत नाही. पण नागरिकांच्या सोयी सुविधा देणारे उमेदवारच या स्पर्धेत खरे उतरतील. फुगीर व मग्रुरी असलेल्या उमेदवाराला मतदार घरचा रस्ता दाखवतील. असे म्हटले जाते की, सत्ताधारी पक्षाचे नेतेमंडळी म्हणते या प्रभागात जास्त काम करण्याची गरज नाही. परंतु नागरिकांना जेव्हा आमच्या प्रतिनिधींनी विचारणा केली तेव्हा सर्व पितळ उघड झाले.

# प्रभाग २५ चा खरा विकास करून दाखवणार- रमेश दहीहांडे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



प्रवीण खरे



वैशाली कोरडे



पूजा वाघ



रमेश दहीहांडे

छत्रपती संभाजीनगर प्रभाग क्रमांक २५ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अधिकृत उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरला आहे अ गटातून प्रवीण खरे ब मधून वैशाली कोरडे क मधून पूजा वाघ व ड गटातून रमेश दादा दहीहांडे यांनी उमेदवारी दाखल केलेली आहे.

प्रभाग क्र. २५ (ड) मुर्तिजापूर मध्ये प्रचार दौरा पार पडला. या सर्व उमेदवारांत वरिष्ठ शिवसैनिक म्हणून तसेच सर्वात अनुभवी निष्ठावंत कट्टर असे रमेश दादा दहीहांडे यांचा जनसंपर्क दांडगा असून कधीही फोन लावा दादांकडून नकार कधी येत नाही सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता अशी त्यांची ओळख आहे. नागरिकांची प्रमुख समस्या पाण्याची असून ती सोडवण्यासाठी शर्तीने प्रयत्न करणार त्याचबरोबर रस्ते नशेखोरी शिक्षण महिलांची सुरक्षा यास इतर नागरिकांच्या सोयी सुविधांकडे आम्ही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे चारही उमेदवार कटिबद्ध आहोत.

प्रभाग क्रमांक २५ मधून जनतेच्या सेवेसाठी निवडणूक लढत आहोत नक्कीच जनता आमचा विचार करेल असे आम्हाला वाटते, असेही उमेदवारांनी सांगितले. मनीषा खरे यांनीही शैक्षणिकदृष्ट्या आपले विचार मांडले ते म्हणाले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी विचारवंताची कार्यशाळा व आपले विद्यार्थी बाहेर शिक्षणासाठी व नोकरीसाठी न जाता येथेच राहून प्रगती कशी साधतील याकडे लक्ष देवू. महिलांच्या ज्या काही कामाच्या व फायद्याच्या योजना असतील त्याआम्ही त्यांना समजवू तसेच मार्गदर्शन शिबिर भरवू असेही, मनीषा खरे यांनी अट्टलमतच्या पत्रकाराशी बोलताना सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199